

देगलूर : मराठी भाषासंवर्धन पंधरवडानिमित्त देगलूर महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले.

# देगलूर महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

देगलूर, ता. २ (बातमीदार) : देगलूर महाविद्यालयातील ग्रंथालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त महापुरुषांचे प्रेरणादायी आत्मचरित्र, कथा कादंबरी, शब्दकोश, विश्वकोश, अग्रलेख संग्रह अशा विविध ग्रंथांचे भव्य प्रदर्शन भरवण्यात आले.

वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी आणि विद्यार्थ्यांनी उत्तम पुस्तके वाचावीत, ग्रंथालयाशी मैत्री जोडावी, त्यातून व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रेरणा घ्यावी, याकरिता पुस्तक प्रदर्शन प्रेरक असते. या करिता दरवर्षीप्रमाणे ग्रंथप्रदर्शन ठेवण्यात आले. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे, कार्यालय अधिक्षक गोविंद जोशी, मराठी विभाग प्रमुख डॉ. विठ्ठल जंबाले, डॉ. सर्जेराव रणखांब, डॉ. रत्नाकर लक्षट्टे, डॉ. माधव चोले, डॉ. संजय देबडे, ग्रंथपाल डॉ. साईनाथ शिंदे, सहाय्यक ग्रंथपाल श्रीनिवास नाईक, ग्रंथालय लिपिक भीम कर्णे, कनिष्ठ लिपिक दीपक संगमकर, बालाजी गोविंदवार, रेखा इळेगावकर हे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने प्रदर्शनासाठी भेटी दिल्या.

Scanned with OKEN Scanner